# CURRENT GLOBAL REVIEWER

Impact Factor – 7.139 ISSN – 2319-86948
Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

# Changing Religious Movements in Pre-Medieval Indian History

**17-18 January 2020 Special Issue – 101 Vol. I**

Chief Editor
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editors**
*Guide*
**Dr. B. G. Gaikwad**
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*
**Dr. Balasaheb Shankarrao Kshirsagar**
**Head, Department of History**
**Shivaji College, Hingoli (MS)**

*Co-Editor*
**Dr. Sandeep G. Londhe**
**Department of History**
**Shivaji College, Hingoli (MS)**

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -101 , Vol. I | Jan. 2020 | Peer Reviewerd

# Index


1. The Concept of Dhamma in Ancient and Pre-Medieval Period: A Critical Perspective — 1
   Dr. Rahul Varvantikar
2. The History Of Subaltern And Oppressed: A Review — 4
   Prof. Dr. Rajkumar S. Kamble
3. 'Rise of the Sect of Tantra and Pre Medieval Era – A Critical Study' — 7
   Dr. Londhe Sandeep Govindrao
4. "Pre-Medieval Religious Movements – Special Reference toBhaktism" — 10
   Dr. Kashinath N.Chavan
5. Religious Revival in South India — 15
   Dr. Benjalwar S.G.
6. Religious Movements and Literature: Character study of Rosie and Ammu — 18
   Dr. Ravi Satbhai
7. Philosophy of Buddhism: An Ambedkarite Perspective — 21
   Nirajkumar Deomanrao Ambhore
8. Religious Reform Movements In India — 24
   Ramprasad M. Vhadgir
9. Sufism: An Early Medieval Religious Movement — 28
   Dr. Kashinath N.Chavan
10. Causes of Decline of Buddhism In Medieval Period : A Brief Study — 31
    Dr. Sukhadev Piraji Balkhande
11. Warkari Cult and Humanity — 35
    Ramprasad M. Vhadgir
12. जागजी बारव स्थापत्य एक धार्मिक दृष्टीक्षेप — 37
    डॉ.गंगथडे आर.डी.
13. वीरशैव साहित्य-ऐतिहासिक साधन — 39
    प्रा.डॉ. जी.एस.पाटील.
14. नाथ संप्रदायातील गुरु-शिष्य परंपरा — 42
    डॉ.भेलोंडे जगदीश व्यंकटरराव
15. मध्ययुगीन भारतीय इतिहासातील स्त्री दर्शन — 44
    डॉ. राजेंद्र साहेबराव धाये,
16. पूर्वमध्यकालीन तंत्रशास्त्र — 47
    प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के
17. महात्मा बसवेश्वर - धर्मसुधारणा व तत्वज्ञान — 50
    डॉ. विठ्ठल व्यंकटराव घुले
18. शंकराचार्यांचा अद्वैतवाद - एक अभ्यास — 55
    प्रा. डॉ. क्षिरसागर बि.एस.

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -101, Vol. I | Jan. 2020 | Peer Reviewerd

55

# पूर्वमध्यकालीन तंत्रशास्त्र

**प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के**
संशोधन मार्गदर्शक,दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर. ता. भोकर जि. नांदेड.

---

**प्रास्तावना-**

पूर्वमध्यकालीन जी सामाजिक आंदोलने झाली त्यात इ.स. च्या आठव्या शतकात तंत्रशास्त्राने समाज जीवनावर फार मोठा प्रभाव टाकला होता. पाल राजवटीतील धर्मपाल (७७०-८१०) यांच्या समकालीन असलेले सरहपा किंवा सिध्द सरहपा यांनी बौध्द धर्मात वज्रयान आणि सहजयान या तांत्रिक शाखेची निर्मिती केली. पूर्व मध्यकालीन ही एक धार्मिक चळवळ होती. तंत्रशास्त्राचे धागेदोरे अगदी प्राचीन काळापासून उपलब्ध होतात. अथर्ववेदात आढळून येणारी जादूटोणा यावरील सुक्ते ही तंत्राची प्रारंभिक अवस्था होती असे मानले जाते तर त्या पूर्वी सिंधूकाळात सापडलेल्या शक्तीच्या मूर्ती या पूढील काळात शाक्तमताच्या रूपाने विकसित झाली असे मानले जाते. यानुषंगाने पूर्व मध्यकालीन तंत्ररूपाने आलेले सामाजिक आंदोलन अभ्यासने हा या शोध निबंधाचा हेतू आहे.

**तंत्रशास्त्राचा उदय -**

संस्कृत भाषेत 'तंत्र' शब्दाचे अनेक अर्थ आहेत. येथे एका विशिष्ट अर्थानेच 'तंत्र' हा शब्द वापरलेला आहे. तो अर्थ असा; विशिष्ट देवतेच्या उपासनेची विशिष्ट प्रकारची सविस्तर पध्दती म्हणजे तंत्र वा तंत्रमार्ग होय. तंत्रपदाचा धात्वार्थ विस्तारणे असा आहे. ज्या ग्रंथामध्ये विशिष्ट इष्टदेवतेची पूजा किंवा साधना विस्ताराने सांगितलेली असते; त्यास तंत्रशास्त्र म्हणतात. मंत्रशास्त्र, आगम, यामल आणि क्वचित निगम हेही तंत्रशास्त्राचे पर्याय आहेत. [१] 'तनू विस्तारे' या विस्तारार्धक धातूपासुन 'तंत्र' शब्द बनला आहे, ज्याच्या द्वारे अध्यात्माचा किंवा तत्वज्ञानाचा विस्तार केला जातो; ते तंत्रशास्त्र होय. कामिकागमात तंत्राची व्याख्या पूढील प्रमाणे दिलेली आहे.

तनोति विपुलानर्थान तत्वमन्त्रसमन्वितान् ।
त्राणं च कुरूते यस्मांत तंत्रमित्याभिधीयते ।।

अर्थ - तत्व आणि मंत्र यांनी युक्त अशा व्यापक अर्थाचा विस्तार करणारे आणि ( साधकांचे साधनेच्या द्वारे) परित्राण करणारे जे शास्त्र, त्याला तंत्र असे नाव आहे. तंत्राला 'आगम' असे ही म्हणतात. मानवाच्या कल्याणासाठी शंकराने पार्वतीला आगम अर्थात तंत्रशास्त्र सांगितले असे म्हणतात,

शिव पार्वतीला म्हणतो,

कलावागममुल्लउध्य योडन्यमार्गे प्रवर्तते ।
न तस्य गतिरस्तीति सत्यं सत्यं न संशय : ।।

अर्थ - कलियुगात आगमांचे उल्लंघन करून जो मनुष्य (साधनेच्या) अन्य मार्गाने प्रवृत्त होतो, त्याला गती (भुक्ति मुक्ती) नाही, हे त्रिवार सत्य आहे आणि यात (कसल्याही प्रकारचा) संशय नाही. [२]

तंत्रशास्त्रात आगम, यामल, तंत्र असे तीन विभाग आहेत. शिवशक्तीचे मीलन घडवून आणणे आणि मानवी आत्म्यावर संस्कार करून अद्वैतरुप आत्मज्ञानाचा साक्षात्कार घडविणे तंत्राचा उद्देश आहे. शैव सांप्रदायाच्या प्रभावातूनच शिवाची सहचर म्हणून देवीची जी उपासना होऊ लागली तीच पूढील काळात 'तंत्र' या नावाने ओळखली जाऊ लागली. शक्तीच्यारुपाने आराधना होत असल्याने त्यास शाक्तमत अथवा संप्रदाय म्हणून उदय झाला. अगदी प्रारंभिक काळापासून शत्रूवर विजय प्राप्त करण्यासाठी जादूटोणा वापरला जात असावा. अथर्ववेदातील कांही सूक्ते या संबंधाने पहाता येतात. यातून हा सांप्रदाय लैंगिक उपासनेतून मोक्षप्राप्तीच्या मार्गाकडे वळला असावा. ज्याचे उदाहरण म्हणून भारतातील शिवलिंग उपासना म्हणता येईल. या उपासनेत मदिरा, गांजा, भांग हे प्रामुख्याने वापरण्यात येत असून याचा उपयोग एकाग्रता वाढविण्यासाठी केला जात असे, त्यातूनच तंत्रसाधनेत मुद्रा आणि आसन या क्रियेसाठी केला जाऊ लागला. [३]

**तंत्र आणि पूर्वमध्यकालीन आंदोलन-**

पाल राजवंश उत्तर भारतातील एक सामर्थ्यशाली राजवंश होते. जे की इ. स. ७५०-११७४ या काळात अस्तीत्वात होते. पाल राजवटीत बौध्दकलेला फार मोठ्या प्रमाणात राजाश्रय प्राप्त झालेला होता. पाल राजे स्वत: हिंदू असले तरी बौध्द विचारधारेला प्रेरणा देण्याचे कार्य मोठ्या प्रमाणात केल्याचे दिसून येते. पाल राजे बंगाल मधील सर्व शक्तीमान राजे होते. याच काळात सरहपा किंवा सिध्द सरहपा नावाच्या व्यक्तीने बौध्द तंत्रशास्त्रातील वज्रयान आणि सहजयान या शाखा निर्माण केल्या. सरहपा यांना हिंदीचे प्रथम कवी असेही म्हटले जाते. सरहपा यांचे मूळगाव राहूलभद्र होते. परंतु अनेक ठिकाणी त्यांच्या नावाचा उल्लेख सरोजवज्र, शरोरुहवज्र, पद्म तसेच पद्मवज्र असाही सापडतो. सरहपा यांच्या जन्मस्थानाविषयी एकमत आढळून येत नाही. तिब्बती मतानुसार ते उडीसा येथील होते तर जनमतानुसार सहरसा जिल्ह्यातील पंचगछिया या गावातील होते असेही मतप्रवाह आहे. [४] वज्रयान व सहजयान या तंत्रशाखेच्या निर्मीती मागे ब्राम्हणवादी वैदिक विचारधारेस विरोध करुन विषमतामूलक समाजाच्या ऐवजी सहज मानविय व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न होता. [५] बौध्द धर्मासंबंधी तांत्रिक ग्रंथ 'गुह्य समाज' तसेच 'मंजुश्री मुलकल्प' ह्यात ध्यानाच्या तांत्रिक स्वरुपाचे उल्लेख आलेले आहेत. बौध्द धर्मातील वज्रयानात विभित्र देवीची उपासना होत होती. वज्रयानाने मोक्ष प्राप्तीसाठी नव्या तत्वाच्या रुपाने 'महासुख' ही संकल्पना दिली. [६]

जाणिवेची उच्च पातळी आणि शक्तीप्राप्त करण्यासाठी नैसर्गिक कामप्रेरणेचा उपयोग करीत जे कामविधी आचरले जातात त्यांना सामान्यत: तांत्रिक कामाचार म्हणतात. हे सर्व मिळविण्यासाठी साधू, महंत, सन्यासी, संत, साध्वी वगैरे होण्याची गरज नसते. आपले सर्व सामान्य जीवन त्याचा रोजचा प्रवाह चालू ठेवायचं असतं, फक्त जगण्याबद्दल आपल्या दृष्टीकोणात परीवर्तन अणायचं असते. जगभर एक असं मिथक प्रचलीत आहे की, उच्च कोटीच्या अध्यात्मिक व्यक्तीच्या ठाई कामउर्जा अजिबात नसते. ही समजूत अगदी चुकीची आहे.[७] तांत्रिक सांप्रदायाने उपासना मार्गात संसारातून मुक्ती मिळविण्यासाठी सन्यास, देहदंड, त्याग इत्यादी मार्गाचा अवलंब न करता उलट भोगातून मोक्षाचा मार्ग स्विकारणे ही प्रेरणा दिली आहे. या तांत्रिक उपासनेत पुरुष साधका सोबत स्त्री साधक भाग घेत असते. बौध्द तंत्रात बुध्दाबरोबर त्याची शक्ती तारा तर शैवतंत्रात शिवा सोबत शक्ती यांचे उल्लेख आढळतात. यातील प्रत्येक विधी 'म' कारापासुन सुरु होतो. मद्य, मांस, मत्स, मुद्रा आणि मैथुन हे पंचमकार अत्यावश्यक असतात.[८] तंत्रशास्त्राहून अन्य मोक्षशास्त्रे असे म्हणतात, की ज्यांना विषयभोग पाहिजे त्यांना मोक्ष मिळणार नाही, ज्यांना मोक्ष पाहिजे, त्यांनी विषयभोगाची अपेक्षा करू नये. परंतु भुक्ती व मुक्ती अथवा भोग व योग हे उद्देश अविरोधाने साध्य करण्याचा मार्ग म्हणजे तंत्रमार्ग होय.[९] वैदिक व स्मार्त धर्मांचा अधिकार मुख्यत: पुरुषांना आहे; परंतु पुराणोक्त व तंत्रोक्त पूजा, ध्यानयोग इ. धार्मिक कर्मांचा अधिकार स्त्रियांना प्राधान्य असल्यामुळे सहभागी होणे आवश्यक मानले आहे. तंत्रशास्त्राप्रमाणे स्त्रीमध्ये शक्तितत्व पुरुषापेक्षा अधिक प्रकट आहे; म्हणून तंत्रमार्गात स्त्रीतत्व असलेल्या शक्तीदेवीची साधना ही प्रधान मानली आहे. गुरूप्रमाणेच देवतेचे मूर्तरूप म्हणून स्त्रीची पूजा करण्याचा विधीही तांत्रिक कर्मकांडात अंतर्भूत आहे; महार्णवतंत्रात स्त्रीने सती जाणे निषिध्द होय; स्त्रियांचा मान विशेष राखावा, असे निक्षून सांगितले आहे. तंत्रमार्गाचे गुरुत्व किंवा आचार्यत्वही करण्याचा अधिकार स्त्रीला मान्य केला आहे.[१०] स्त्रीला ज्याप्रमाणे तांत्रिक पूजेचा स्वतंत्र अधिकार आहे, त्याचप्रमाणे शूद्रांसह सर्व वर्णांना अधिकार सांगितला आहे. चार वर्णांहून भिन्न मानलेल्या अनुलोम व प्रतिलोम संकर जाती, चंडालादी अंत्यज जाती, म्लेच्छ इ. सर्व मानव तंत्रमार्गाची दीक्षा घ्यावी, असे सांगितले आहे.[११]

**वज्रयान-**

बौध्द धर्मातील तांत्रिक पंथात वज्रयान आणि सहजयान यांना मध्ययुगात अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले होते. या सांप्रदायाचा तत्कालीन समाजावर मोठा प्रभाव होता. मंत्रयान व वज्रयान याचा निकटचा संबंध आहे. किंबहुना मंत्रयानाचीच परिणीती वज्रयानात झली. मुळच्या बौध्द धर्मात मंत्र आणि हटयोग होता तो पर्यंत तो मंत्रयान नावाने ओळखला गेला परंतु त्यात मैथुन प्रविष्ठ होताच मंत्रयान हे वज्रयान नावाने ओळखले जाऊ लागले. इ. स. ८०० ते १२०० हा वज्रयानाचा एकूण भरभराठीचा काळ मानला जातो.

तांत्रिकातील सिध्दांमध्ये सरहपा हा आदिसिध्द आहे. वज्रयानाला एक सार्वजनिक धर्म या योग्यतेला आणून सोडले. सरहपाच्या पूर्वी वज्रयानी साधना गुप्तपणे केली जात असे. सरहपाच्या प्रचारानंतर ती उघडपणे होऊ लागली. वज्रयानी या शब्दातला 'वज्र' हा शब्द यात वेगळया अर्थाने घेतला आहे. वज्रयानी बौध्दांनी त्याला शुन्यतेचे प्रतीक मानले आहे. सर्व वस्तुजातीचे उगमस्थान शून्य असून ते वज्राप्रमाणे अभेद्य व अविनाशी असते. वज्रयानी पंथाचे आचार विचार सांगणारे 'गुह्यसमाजतंत्रात' सिध्दी याच जन्मात स्वेच्छेने, विषयसुख भोगता - भोगताच प्राप्त होते, असे म्हटले आहे. बौध्द धर्मात शक्तीतत्वाचा समावेश व उद्घोष याच ग्रंथाने केला. बुध्द आणि बोधिसत्व हे शक्तीसहीत उपास्य होत, असे म्हटले आहे. वज्रयानमते स्त्री जननेंद्रिय हे पद्म स्वरुप असून, पुरुषाचे जननेंद्रिय हे वज्रप्रतीक आहे; असे मानले जाते. तिबेट मधील काष्ठ शिल्पातून, तसेच ब्रांझ मूर्तीमधून आढळणाऱ्या याब - युम संभोग अवस्थेतील प्रतीकेही याचाच परिणाम आहे.

**सहजयान-**

मध्यपूर्वकालीन बौध्द धर्मातील हा दुसरा तंत्र सांप्रदाय आहे. योगाचार सांप्रदायात जो अर्थ शुन्याचा, तोच अर्थ या सांप्रदायातील 'सहज' शब्दाचा आहे. 'शुन्य' शब्दा ऐवजी 'सहज' या शब्दाला स्विकारलेले आहे. सहजयानी साधकांनी परमतत्व आणि आत्मा अशा दोन्ही अर्थी सहज शब्द वापरला आहे. सहज म्हणजे मन व इंद्रिय यांची स्वाभाविक प्रवृत्ती होय. मन व इंद्रिय यांना त्यांच्या स्वाभाविक मार्गाने जाऊ देणे व त्यांना विरोध न करता त्यांच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करणे ही 'सहज' साधना होय. सहजयानी साधक गुरुच्या आदेशनुसार एखाद्या स्त्रीला आपली 'महामुद्रा' बनवितात. त्या महामुद्रेच्या सहवासात ते आपली साधना करतात. महामुद्रेला ते प्रज्ञा म्हणत व स्वत:ला उपास्य समजत. दोहोंच्या मनोवृत्तीत पुर्ण समावस्था निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न असे. सर्व प्रकारच्या कामोपभोगांनीच सहजसिध्दी प्राप्त होईल, या विश्वासाने ते महामुद्रेशी रममाण होत असत. जड-चेतन, मंगल-अमंगल, सात्विक-तामसी, कोमल-ओबडधोबड, सुंदर-कुरुप अशा जीवनातील द्वंद्वाचे संतुलन करण्याची प्रवृत्ती तांत्रिकांमध्ये होती. लिंग, स्त्री योनी, नाग, अंडाकृती इ. आकाराच्या भवघण प्रतिमांची पुजा प्रचलित केली. तांत्रिक सांप्रदायाच्या प्रभावातून अनेक कामशिल्पे निर्माण झाली असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.[१२] तंत्राच्या संदर्भात श्री गोविंद शास्त्री यांनी एक वेगळा दृष्टीकोण मांडलेला आहे. त्यांच्या मते, "सेक्स का शिक्षा में समावेश करणेवाली विधी थी । यह स्मरण रखने की बात है कि भारत में शिक्षा का संबंध तंत्र के विकास के पहिले तक, मोक्ष से रहा था और तंत्र में शिक्षा का उद्देश नही बदला, बदला प्रकार और दृष्टीकोण."[१३] तंत्रशास्त्राने समागमाची शिक्षा न देता समागमाला शिक्षणात समाविष्ट केल्याचे दिसते. सामान्यजनांचा समागम हा बाह्य स्तरावर असतो तर तांत्रिक समागम बाह्य स्तरापर्यंत न रहाता आंतरीक शक्तीचा विकास आणि साधनेचे माध्यम बनते.

सारांशरुपाने असे म्हणता येईल की,

१. भोग व योग हे दोन्ही उद्देश अविरोधाने साध्य करण्याचा मार्ग म्हणजे तंत्र मार्ग होय. तंत्रमार्गाने एकंदरीत जड चैतन्याच्या द्वंद्व विकासासाठी मुक्तक्रीडा ही तांत्रिकांनी अंतिम सत्याच्या रुपाने हाताळली.

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -101, Vol. I | Jan. 2020 | Peer Reviewerd

२. तंत्रात साधनेच्या प्रसंगी वर्णभेद व जातिभेद न पाळता स्त्रीपुरुषांनी एकत्र जमून साधनेत सहभागी व्हावयाचे, सहभोजन करावयाचे, मद्यमांसादिकांचे सेवन करावयाचे असल्याने तंत्रात वर्णभेद, जातिभेद आणि लिंगभेद दिसुन येत नाही.
३. तांत्रिक सांप्रदायाच्या प्रभावातून कामशिल्पे निर्माण झाली.
४. तंत्रमार्गात स्त्रीतत्व असलेल्या शक्तीची साधना प्रमाण मानली आहे. त्यामुळे स्त्री पुजा आणि जनन फलनासह स्विकारलेली आहे.
५. तंत्रमार्गाने गुरुत्व किंवा आचार्यत्वही करण्याचा अधिकार स्त्रीला मान्य केला आहे.
६. जाणिवेची उच्च पातळी आणि शक्तीप्राप्त करण्यासाठी नैसर्गिक कामप्रेरणेचा उपयोग तांत्रिकांनी केला.
७. तांत्रिक सांप्रदायाने उपासना मार्गात संसारातून मुक्ती मिळविण्यासाठी सन्यास, देहदंड, त्याग इत्यादी मार्गाचा अवलंब न करता उलट भोगातून मोक्षाचा मार्ग स्विकारणे ही प्रेरणा दिली आहे.
८. मध्यपूर्वकाळात वज्रयान आणि सहजयान या रुपाने तंत्रशास्त्राला नव्याने उभारी निर्माण करुन दिली जे एक प्रकारे असमानता असलेल्या वैदिक धर्माविरुध्द समानतेची शिकवण देणारी तांत्रिक चळवळ म्हणून समाजात रुढ करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

मानवी जीवनातील मैथुन ही खाजगी बाब मोक्षप्राप्तीसाठी न त्यागता त्यास तात्विक अधिष्ठान प्राप्त करुन देत भोग आणि योग यांच्या माध्यमातून मोक्ष साधण्याचा नवा मार्ग देण्याचे काम तांत्रिकांनी केले असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ-**

१. श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, (प्रमुख संम्पादक) मराठी विश्वकोश, खंड सातवा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई - १९७७, पृ. ४०
२. पं. महादेवशास्त्री जोशी, भारतीय संस्कृतीकोश, तिसरा खंड, शनिवार पेठ, पुणे-२, १९६५, पृ. ७९५-७९६.
३. Chakravarti Chintaharn, The Tantras : Stgudies on the religion and Literature, Culkatta, 1963, p. 79
४. hi. Wikipedia.org>wiki> सरह
५. सरहपा, भारतकोश, bharatdiscovery.org>india>सरहपा
६. Das H. C. Tantricizam, Delhi, 1981, p. 02
७. हटंगडी रोहीणी, (संम्पा.) मधुरिका (ले.) चारचौघी (मासिक), डिसेंबर २०१०, वर्ष ११ वे, अंक नववा, पृ. ७०
८. शास्त्री देवदत्त, तंत्र सिध्दांत और साधना, स्मृती प्रकाशन, इलाहाबाद, १९८२, पृ. ३२
९. पूर्वोक्त, श्री लक्ष्मणनशास्त्री जोशी, पृ. ४१
१०. कित्ता, पृ. ४१
११. कित्ता, पृ. ४१
१२. देशपांडे सु. र., भारती कामशिल्प, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८६, पृ. ३६-३९
१३. शास्त्री गोविंद, तंत्रदर्शन - तंत्रशास्त्रो का सार ग्रंथ, सर्वार्थ सिध्दी प्रकाशन, दिल्ली, १९८०, पृ. ४७